पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई
Email ID–ps.paydhunie.mum@mahapolice.gov.in
/ Phone – 022 23473333/23471785

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट दिनांक : ०४/०५/२०२४

## २१ वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीतास फेरअटक केले बाबत.

---

पायधुनी पोलिस ठाणे गु.र.क्र. १०१/२००१, कलम ३७९,३४ भादवि, कोर्ट केस क्र. ८५०/पी/२००३ या गुन्हयाची नियमित सुनावणी मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, २ रे न्यायालय, मांझगाव, मुंबई यांच्या न्यायालयात चालू आहे. नोंद गुन्हयातील आरोपी नामे रौफ उर्फ बबलु शेख, वय ५२ वर्षे हा सदर गुन्हयाच्या सुनावणीकामी मा. न्यायालयात वारंवार गैरहजर रहात असल्याने त्यास मा.न्यायालयाने फरारी घोषित केले होते व तेव्हापासुन आरोपी फरार होता व तो मिळुन येत नव्हता.

सदर फरारी आरोपीताचा पोउनि अनिल वायाळ व पथक यांनी गुप्त बातमीदारामार्फत व तांत्रीक तपास करुन आरापपी हा गोकुळधाम सोसायटी, सेक्टर, ३५ डी, खारघर, नवि मुंबई या ठिकाणी राहण्यास असल्याचे शोधुन काढले.नमुद पथकाने सदर ठिकाणी सापळा रचुन फरारी आरापीतास शिताफिने ताब्यात घेतले व पायधुनी पोलीस ठाणेस आणुन अटक करण्यात आली.सदर आरोपी या गुन्हयाबरोबर इतर गुन्हयातही फरारी असुन विविध पोलीस ठाणेमधील पोलीस पथके त्याचा शोध घेत होती, विविध न्यायालयांनी त्याचेविरुध्द अजामीनपात्र वॉरंट काढलेली होती.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त मा. अभिनव देशमुख सो., मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २, मा. डॉ मोहितकुमार गर्ग सो., मा. सहाय्यक पोलीस आयुक्त पायधुनी विभाग श्रीमती ज्योत्सना रासम, पायधुनी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. बाळकृष्ण देशमुख सो., पोलीस निरीक्षक श्री. नितीन पगार (गुन्हे) यांच्या मार्गदशनाखाली पोलीस उप निरीक्षक अनिल वायाळ, पो.ह कैलास भोईटे, इरफान खान, दिपक निकम, प्रमोद कदम, प्रविण चौधरी तसेच पो शि.शंकर राठोड, नितेश घोडे, प्रकाश अलदर व विलास पाडवी यांनी केली आहे.

--oo--